कार्यालयीन पत्र व्यवहार

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

प्रधान कार्यालय : "मुंबै बँक भवन", २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

---

जा.क्र.मुंबै बँक/कर विभाग/फा-का.सू./२०१५-२०१६/2716 दिनांक : १३/११/२०१५

## -:: कार्यालयीन सूचना ::-

सेवाकर विभाग यांनी निर्गमित केलेल्या सुचनांनुसार दिनांक १५/११/२०१५ पासून सेवा कर प्रणालीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत.

सेवाकर आकारणीचा दर १४% वरुन १४.५०% करण्यात आलेला आहे. सबब, बँकेतर्फे देण्यात येणा-या व सेवाकर लागू असणा-या सेवांवर सेवाकराचा दर १४.५०% आकारण्यात यावा.

भाडेतत्वावरील शाखा / विस्तारकक्षाचे भाडे अदा करताना ज्या जागा मालकांनी सेवाकराची मागणी केलेली आहे. त्यांना सेवाकर १४.५०% दराने अदा करावा. (माहे नोव्हेंबर २०१५ पासुन)

बँकेतर्फे घेण्यात येणा-या सेवांवर (इनपूट सर्व्हीस) कंत्राटदारांतर्फे सेवा कर आकारला जातो. सदर सेवाकर देखील १४% वरुन १४.५०% इतका झालेला आहे. सदर सेवाकर कंत्राटदाराचे बिलामध्ये समाविष्ट असल्यास, अदा करताना सेवाकराच्या ५०% रक्कम सेनव्हॅट क्रेडिट पोटी नावे टाकून अदा करावी व उर्वरित ५०% रक्कम सेवाकर (Service Tax Paid) खाती नावे टाकून अदा करावी.

तरी उपरोक्त सूचनांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे व खातेदारांच्या माहिती करीता उपरोक्त सूचना शाखेचे सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावी.

**सहाय्यक सरव्यवस्थापक**
**हिशेब विभाग**

**प्रति,**

१. शाखा व्यवस्थापक

**सर्व शाखा**

२. श्री.---------------------
सहाय्यक सरव्यवस्थापक / व्यवस्थापक

३. विभागीय व्यवस्थापक
--------------------------- विभाग

**सहाय्यक सरव्यवस्थापक**
**हिशेब विभाग**

Z:\Naik saheb\RL2670.doc